**अपंग व्यक्ती (समान संधी, संपूर्ण सहभाग व हक्काचे संरक्षण) अधिनियम, १९९५ नुसार आदिवासी विकास विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील क्षेत्रीय कार्यालय तसेच महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाच्या आस्थापनेवरील गट-अ. ब. क व ड मधील पदावर शारीरिक दृष्टया अपंग व्यक्तींकरिता सरळसेवा भरतीमध्ये आरक्षण ठेवणे व सूट देणेबाबत.**

महाराष्ट्र शासन

आदिवासी विकास विभाग,

शासन निर्णय क्रमांक : आस्था-१००२/प्र.क्र.४५/का.१५

मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.

दिनांक : ३० ऑगस्ट, २००५.

__वाचा__ :- १) अपंग व्यक्ती (समान संधी, संपूर्ण सहभाग व हक्कांचे संरक्षण) अधिनियम, १९९५ (१९९६ चा-१)

२) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-एसआरव्ही-१०९८/प्र.क्र.१२/१६-अ, दि.२ मे, १९९८

३) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्र.आस्था-१०९८/प्र.क्र.३५/का.१५, दिनांक २८ ऑक्टोबर,१९९८

४) सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य क्रीडा व विशेष सहाय्य विभागाचे पत्र क्र.अपंग-२००२/प्र.क्र.३२६/सुधार-३, दिनांक २९.१०.२००३

५) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्र.आस्था-१००२/प्र.क्र.४५/का.१५, दि.१२ जानेवारी,२००४.

__शासन निर्णय__ :- अपंग व्यक्ती (समान संधी, संपूर्ण सहभाग व हक्काचे संरक्षण) अधिनियम,१९९५ (१९९६ चा-१) या अधिनियमातील कलम ३२ व ३३ मधील तरतूदी तसेच पदांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या, कौशल्य व क्षमता लक्षात घेऊन आणि अपंग आरक्षणाचे संनियंत्रण करण्यासाठी शासनाने गठीत केलेल्या तज्ज्ञ समितीने या संदर्भात केलेल्या सूचना विचारात घेऊन आदिवासी विकास विभागाच्या क्षेत्रीय कार्यालयातील तसेच महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाच्या सेवेतील गट-अ, ब, क व ड मधील पदावर सरळसेवेने भरती करताना अपंग व्यक्तींकरिता आरक्षण लागू करण्याकरिता प्रस्तावनेतील अ.क्र.५ येथील शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

२. परंतु, रिट याचिका क्रमांक १२९/२००३ च्या सुनावणी प्रसंगी मा.उच्च न्यायालयाने अपंगांसाठी सुयोग्य पदे निश्चित करण्यासाठी तज्ज्ञ समितीची पुनर्रचना करावी व सदर तज्ज्ञ समितीने अपंगांसाठी सुयोग्य पदे निश्चित करण्यासाठी सर्व शासन निर्णयाचे पुनर्विलोकन करुन त्यातील त्रुटी दूर करण्याचे आदेश दिले आहेत. प्रस्तावनेतील अनुक्रमांक ५ येथील शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट "अ" मध्ये अस्थिव्यंगाच्या रकान्यामध्ये तज्ज्ञ समितीने सुचविल्याप्रमाणे सुधारणा करण्यात आल्या असून यासोबत जोडलेल्या सुधारित परिशिष्ट-अ मध्ये दर्शविल्यानुसार संदर्भाधीन दिनांक १२.१.२००४ चे आदेश

C:\2005CR 45 - 2005

अधिक्रमित करुन अपंगांसाठी सुधारित अरक्षण लागू करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे ज्या पदावर अपंग गटातील विशिष्ट प्रवर्गातील व्यक्तीची नियुक्ती करता येणार नाही त्या प्रवर्गाच्या आरक्षणातून संबंधित पदास सूट देण्यात आली असून त्याचा उल्लेख सदर परिशिष्टात करण्यात आला आहे. गट-अ, ब, क व ड मधील पदावर अपंग व्यक्तीची नियुक्ती करण्यापूर्वी ते खाली नमूद केलेल्या अटी पूर्ण करतात याची खातरजमा करण्यात यावी.

(१) उमेदवार संबंधित सेवाप्रवेश नियमाच्या तरतुदीनुसार अर्हताधारक आहे.

(२) संबंधित पदाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या आणि परिशिष्ट "अ" मधील निकष लक्षात घेऊन त्याप्रमाणे वैद्यकीय मंडळाने अथवा सिव्हील सर्जन यांनी नियुक्तीसाठी सक्षम ठरविले आहे.

२. वरील संदर्भ क्र.१ च्या अधिनियमातील कलम ३३ अनुसार अपंगासाठी एकूण पदसंख्येच्या किमान ३ टक्के पद आरक्षित करणे आवश्यक आहे. त्यापैकी अल्पदृष्टी, अंशत: बहिरेपणा व हातापायाचे अपंगत्व या व्याधींनी ग्रस्त व्यक्तींसाठी प्रत्येकी १ टक्का पद राखीव ठेवणे आवश्यक आहे.

३. अधिनियमातील कलम ३६ नुसार कोणत्याही एका अपंग प्रकारातील उमेदवार उपलब्ध नसल्यास त्या अपंग प्रकारातील ते पद त्या वर्षी रिक्त ठेवण्यात यावे. पुढील वर्षीही त्या पदासाठी त्याच अपंग प्रकारातील उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्या पदावर इतर अपंग प्रकारातील उमेदवाराची नियुक्ती करण्यात यावी व त्यास शासनाची मान्यता घेण्यात यावी.

४. शासकीय कार्यालयातील समान पदांच्या संदर्भातील अपंग आरक्षणाबाबत सामान्य प्रशासन विभागाचे आदेश लागू होतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( दु.र.चंद्रिकापूरे)
अवर सचिव

प्रति,
मा. राज्यपालांचे सचिव.
मा.मुख्यमंत्र्याचे प्रधान सचिव.
मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव.
मा.मंत्री ( आदिवासी विकास) यांचे खाजगी सचिव.
मा. राज्यमंत्री ( आदिवासी विकास) यांचे खाजगी सचिव.
मा. सचिव ( आदिवासी विकास) यांचे स्वीय सहाय्यक.
मा.प्रधान सचिव, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
मा.अपर मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग,मंत्रालय, मुंबई.
आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे.

आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक.
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहाकारी आदिवासी विकास महामंडळ, नाशिक.
सर्व अपर आयुक्त, आदिवासी विकास ( ठाणे, नाशिक, नागपूर व अमरावती.)
सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.
सर्व उपसंचालक, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती.
कार्यासन अधिकारी, का.क्र. ३,११,१२ व १३, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
निवड नस्ती,का.१५.

## परिशिष्ट - "अ"

अपंग व्यक्ती अधिनियम १९९५ च्या तरतुदीनुसार सरळसेवा भरतीमध्ये अपंग गटासाठी आरक्षण लागू करावयाच्या अथवा आरक्षणातून सूट दिलेल्या आदिवासी विकास विभागाच्या क्षेत्रीय कार्यालयातील तसेच महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळातील पदांचा तपशिल.

| अ. क्र. | पदाचे नाव | पदाचा गट | अंध १% | कर्ण बधिर १% | अस्थि व्यंग १% | शेरा. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | | | ६ |
| १ | उप आयुक्त/ उप संचालक / प्रकल्प अधिकारी (श्रेणी-१) | गट-अ | P.B. | P.D. | O.L, O.A. | पूर्णत: अंध, मुक व शारीरिक लुळेपणा अथवा पक्षाघात झालेली व्यक्ती अपात्र. |
| २ | सहाय्यक आयुक्त, प्रकल्प अधिकारी (श्रेणी-२) | गट-अ | P.B. | P.D. | O.L, O.A. | पूर्णत: अंध, मुक व शारीरिक लुळेपणा अथवा पक्षाघात झालेली व्यक्ती अपात्र. |
| ३ | वरिष्ठ संशोधन अधिकारी | गट-अ | P.B. | P.D. | O.L. | वरील प्रमाणे |
| ४ | विधि अधिकारी | गट-अ | P.B. | सूट | O.A, O.L. | वरील प्रमाणे. |
| ५ | सहाय्यक प्रकल्प अधिकारी/ अधिव्याख्याता / प्रशासकीय अधिकारी | गट-ब | P.B. | P.D. | O.A, O.L. | वरील प्रमाणे. |
| ६ | संशोधन अधिकारी | गट-ब | P.B. | सूट. | O.A, O.L. | वरील प्रमाणे. |
| ७ | संग्रहालय अभिरक्षी | गट-ब | सूट. | सूट. | सूट. | एकाकी पद असल्याने आरक्षण लागू होत नाही. |
| ८ | गृहपाल | गट-ब | P.B. | सूट | O.A, O.L. | अ.क्र. १ प्रमाणे. |

| १ | २ | ३ | ४ | | | ६ |
|---|---|---|---|---|---|---|
| ९ | कनिष्ठ अध्यापक | गट-ब (अराज-पत्रित.) | P.B. | P.D. | O.A or O.L. | वरील प्रमाणे. |
| १० | माध्यमिक शिक्षक | गट-ब (अराज-पत्रित) | P.B. | P.D. | O.A/O.L. | वरील प्रमाणे. |
| ११ | पदवीधर प्राथमिक शिक्षक | गट-ब (अराज-पत्रित) | P.B. | P.D. | O.A/O.L. | वरील प्रमाणे. |
| १२ | प्राथमिक शिक्षक, | गट-क | P.B. | P.D. | O.A/O.L. | वरील प्रमाणे. |
| १३ | चित्रकला शिक्षक , | गट-क | सूट | सूट | O.L. | एकाकी पद. |
| १४ | क्रिडा शिक्षक. | गट-ब | सूट | सूट | सूट | एकाकी पद. |
| १५ | शिक्षण विस्तार अधिकारी | गट-क | P.B. | सूट | सूट. | -- |
| १६ | उप लेखापाल व तत्सम पदे | गट-क | P.B. | P.D. | O.A., O.L. | अ.क्र. १ प्रमाणे. |
| १७ | स्त्री अधिक्षिका, | वर्ग-३ गट-क | सूट | सूट | सूट | -- |
| १८ | अधिक्षक ( पु) | वर्ग-३, गट-क | सूट | सूट | सूट. | -- |
| १९ | वरिष्ठ लिपिक व समकक्ष पदे | गट-क | P.B. | सूट | O.L./ B.L., O.A. | अ.क्र. १ प्रमाणे. |
| २० | आदिवासी विकास निरिक्षक | गट-क | P.B. | P.D. | O.L, O.A.. | वरील प्रमाणे. |
| २१ | ग्रंथपाल | गट-क | P.B. | P.D. | O.L./B.L, O.A.. | वरील प्रमाणे. |
| २२ | प्रयोग शाळा सहाय्यक | गट-क | सूट. | P.D. | O.L. | वरील प्रमाणे. |
| २३ | लिपिक-टंकलेखक | गट-क | P.B. | P.D. | O.L./ B.L. | वरील प्रमाणे. |
| २४ | आरेखक | गट-क | सूट | सूट | सूट. | एकाकी पद असल्याने आरक्षण लागू होत नाही. |
| २५ | कॅमेरामन कम ऑपरेटर | गट-क | सूट | सूट | सूट. | एकाकी पद असल्याने आरक्षण लागू होत नाही. |

| १ | २ | ३ | ४ | | | ६ |
|---|---|---|---|---|---|---|
| २६ | कलाकार तथा शिल्पकार | गट-क | सूट | सूट | सूट. | एकाकी पद असल्यान आरक्षण लागू होत नाही. |
| २७ | वाहन चालक | गट-क | सूट | सूट | सूट. | -- |
| २८ | सहाय्यक ग्रंथपाल | गट-क | सूट | सूट | सूट. | एकाकी पद असल्याने आरक्षण लागू होत नाही. |
| २९ | प्रयोगशाळा परिचर | गट-ड | सूट | P.D. | O.L., O.A.. | अ.क्र. १ प्रमाणे. |
| ३० | स्वयंपाकी | गट-ड | P.B. | P.D. | सूट | वरील प्रमाणे. |
| ३१ | कामाठी | गट-ड | P.B. | P.D. | सूट. | वरील प्रमाणे. |
| ३२ | सफाईगार | गट-ड | P.B. | P.D. | O.L. | वरील प्रमाणे. |
| ३३ | शिपाई | गट-ड | P.B. | P.D. | O.L./O.A. | वरील प्रमाणे. |
| | **आदिवासी विकास महामंडळातील पदे.** | | | | | |
| १ | प्रादेशिक व्यवस्थापक | गट-अ | P.B. | P.D. | O.A., O.L.. | पूर्णत: अंध, मुक व शारीरिक लुळेपणा अथवा पक्षाघात झालेली व्यक्ती अपात्र. |
| २ | उप प्रादेशिक व्यवस्थापक | गट-ब | P.B. | P.D. | O.A., O.L. | वरील प्रमाणे. |
| ३ | व्यवस्थापक | गट-ब | P.B. | P.D. | O.L. | वरील प्रमाणे. |
| ४ | उप व्यवस्थापक (विपणन निरिक्षक) | गट-ब | P.B. | सूट | O.A., O.L. | वरील प्रमाणे. |
| ५ | लेखापाल | गट-ब | P.B. | P.D. | O.A./O.L. | वरील प्रमाणे. |
| ६ | स्वागतिका | गट-क | सूट | सूट | O.A./O.L. | पूर्णत: शारिरीक लुळेपणा अथवा पक्षघात झालेली व्यक्ती अपात्र |
| ७ | वाहन पर्यवेक्षक | गट-क | सूट | सूट | सूट | एकाकी पद असल्याने आरक्षण लागू होत नाही. |
| ८ | विज तंत्री | गट-क | सूट | सूट | सूट | -- |
| ९ | वाहन चालक | गट-क | सूट | सूट | सूट | -- |

| १ | २ | ३ | ४ | | | ६ |
|---|---|---|---|---|---|---|
| १० | सहाय्यक व्यवस्थापक | गट-क | सूट | P.D. | O.A., O.L. | अ.क्र. १ प्रमाणे. |
| ११ | वरिष्ठ सहाय्यक | गट-क | P.B. | P.D. | O.L., O.A. | वरील प्रमाणे. |
| १२ | कनिष्ठ सहाय्यक | गट-क | P.B. | सूट | O.A., O.L. | वरील प्रमाणे. |
| १३ | रोखपाल | गट-क | P.B. | सूट | सूट . | -- |
| १४ | लिपिक- टंकलेखक | गट-क | P.B. | P.D. | O.L/ B.L. | अ.क्र. १ प्रमाणे. |
| १५ | [illegible] | गट-क | सूट | सूट | सूट. | -- |
| १६ | प्रतवारीकार | गट-क | सूट | सूट | सूट. | -- |
| १७ | रखवालदार/ चौकीदार | गट-ड | सूट | सूट | सूट. | -- |
| १८ | क्लिनर | गट-ड | सूट | सूट | सूट. | -- |

B.L. - Both leg affected
B.A. - Both Arm affected
B.L.A.- Both Arm and legs affected
O.A. - One Arm affected
O.L - One Leg affected
M.W.- Muscular wickness
B - Blindness
P.B. - Partialy Blindness
L.V. - Low vision
D - Deaf
P.D. - Partially Deaf
P.S. - Partially Sighted